**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विदयमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६२/२०२०** **दिनांक ०४/०८/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२७५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २९/०७/२०२० ते ०४/०८/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०५/०८/२०२० सकाळी ८:३० पासून ०९/०८/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२९/०७** | **३०/०७** | **३१/०७** | **०१/०८** | **०२/०८** | **०३/०८** | **०४/०८** | | **०५/०८** | **०६/०८** | **०७/०८** | **०८/०८** | **०९/०८** |
| २२.८ | १.० | ५.२ | ०.० | १.४ | ०.० | ६०.६ | **पाऊस (मिमी)** | ३०२ | २०१ | ७९ | ६७ | ४५ |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | २८ | २७ | २९ | ३० | २८ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २४ | २४ | २४ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ५ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९४ | ९४ | ९३ | ९१ | ९२ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ९० | ८७ | ९० | ८३ | ८१ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १७ | २१ | २४ | १७ | १४ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.प. | नै.प. | नै. | नै. | नै.प. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **९१.०** | **११३६.७** | **५१९७.२** |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयात दिनांक ५ ते ९ ऑगस्ट, २०२० दरम्यान बहुतेक ठिकाणी मध्यम ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवते. |
| **ईशारा** | दिनांक ४ ते ५ ऑगस्ट २०२० दरम्यान जिल्हयातील काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊसाची तसेच दिनांक ६ ऑगस्ट २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची आणि दिनांक ७ ऑगस्ट २०२० रोजी काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसासह तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता आहे. दिनांक ८ ऑगस्ट २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता आहे. |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक ९ ते १५ ऑगस्ट, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे. |

| **पिक** | **अवस्था** | **हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | **-** | • जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने नारळ, सुपारी, चिकू बागेतील, भाजीपाला क्षेत्रातील तसेच फळबाग रोपवाटीकेतील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळझाडांना भर देवून काठीचा आधार देण्याची व्यवस्था करावी. |
| **खरीप भात** | **फुटवे अवस्था** | • जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने भात खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी आणि पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात पिक फुटवे येण्याच्या अवस्थेत देण्यात येणारी नत्र खताची दुसरी मात्रा एकरी ३५ किलो युरिया पुढे ढकलावी आणि दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने आंबा बागेत करण्यात येणारी पॅक्लोब्युट्राझोलची (कल्टार) आळवणी पुढे ढकलावी आणि दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना करण्यात यावी.<br>• निसर्ग चक्रीवादळातील नुकसान ग्रस्त आंबा बागेमधील पुर्नस्थापित झाडांवर करपा रोगाच्या नियंत्रणासाठी करण्यात येणारी बुरशीनाशकाची फवारणी पुढे ढकलावी आणि दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना करण्यात यावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने काजू कलमांना देण्यात येणारी खताची मात्रा पुढे ढकलावी आणि दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी.<br>• निसर्ग चक्रीवादळातील नुकसान ग्रस्त काजू बागेमधील पुर्नस्थापित झाडांवर करपा रोगाच्या नियंत्रणासाठी करण्यात येणारी बुरशीनाशकाची फवारणी पुढे ढकलावी आणि दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना करण्यात यावी.<br>• काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या (टी मोस्कीटो बग) किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. कीड पालवीतील रस शोषून घेते त्यामुळे नवीन पालवी सुकून जाते. नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना करण्यात यावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने सुपारीला देण्यात येणारी खताची मात्रा पुढे ढकलावी आणि दिनांक ८ ऑगस्ट २०२० नंतर |

| | | |
|---|---|---|
| | | पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी.<br>• जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फुलोरा अवस्था** | • जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भाजीपाला पिक क्षेत्रात पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने वांगी, भेंडी टोमेटो, मिरची पिकास मातीची भर द्यावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **फुलोरा अवस्था** | • जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता वेलवर्गीय भाजीपाला पिक क्षेत्रात पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने वेलवर्गीय भाजीपाला पिकांमधील मंडपाची डागडूजी करून घ्यावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**